N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कर्जत
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0664 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/10/2024 07:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 22/10/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/10/2024
**Time From (वेळेपासून):** 15:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/10/2024 **Time (वेळ):** 06:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 012
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/10/2024 06:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती, कर्जत,कर्जत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राहुल विष्णु गांगर्डे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोंभळी,कर्जत,कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोंभळी,कर्जत,कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9657736434

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नामदेव दिगंबर कासले | | | 1. पंचायत समिती ,कर्जत,कर्जत, कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अनिल अंकुष भोईटे | | | 1. ग्रामपंचायत आळसुंदा,कर्जत, कर्जत,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | दिपक नाना शेलार | | | 1. कोंभळी ग्रामपंचायत,कोंभळी, कर्जत,कर्जत,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | यशस्वी लाचेचा कारवाइ दरम्यान हस्तगत जप्त रक्कम 3000/रु | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद कर्जत जि.अहिल्यानगर दि.

24/10/2024

मी राहुल विष्णु गांगर्डे,वय-42 वर्षे,व्यवसाय-शेती,रा.कोंभळी,ता.कर्जत,जि.अहिल्यानगर,मो.नं.9657736434 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन मी दि.21/10/2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर यांची लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात समक्ष भेट घेवुन,मला कर्जत येथील एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली.त्यानुसार त्यांनी मला दि.22/10/2024 रोजी 11/30 वा चे सुमारास कर्जत येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले.त्यानुसार मी कर्जत येथे सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो.दुपारी 12/15 वा.दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट हे शासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव,गाव विचारले तसेच त्यांची,त्यांच्या सोबतचे स्टाफ व दोन पंच यांची ओळख सांगितली.त्यानंतर मी पोनि श्री.आल्हाट यांचे सुचनेवरुन शासकीय वाहनात बसलो व दोन शासकिय पंचासमक्ष तक्रार सांगितली की,"माझी मेसाई वस्ती,कोंभळी ता.कर्जत येथे मिळकत गट क्र.70 व 151 मध्ये शेतजमीन असुन,सदर शेतीमध्ये मी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विहीर खोदण्यासाठी सन 2022/2023 मध्ये ग्रामपचांयत कार्यालय कोंभळी ता.कर्जत येथे अर्ज सादर केला होता.सदरचे प्रकरण मंजुर होण्याकरीता तत्कालीन ग्रामसेवक संदीप भोईटे,यांनी माझ्याकडे वीस हजार रुपयांची मागणी केली होती,व पैसे न दिल्यास विहीर प्रकरण मंजुर होणार नाही असे मला सांगितले होते,त्यावेळी नाईलाजास्तव मी त्यांना दि.27 जानेवारी 2023 व 20 फेब्रुवारी 2023 रोजी एकुण अठरा हजार रूपये माझे फोन पे दवारे व त्यानंतर रोख स्वरूपात दोन हजार रूपये असे एकुण वीस हजार रूपये मी त्यांना दिले होते.त्यांनतर दि.25/07/2023 रोजी माझे वैयक्तीक विहीर खोदण्याकरीता गट विकास अधिकारी,पंचायत समिती,कर्जत यांचेकडुन मला मान्यता मिळाली व सदर विहीर खोदण्यासाठी मला पंचायत समिती कर्जत येथुन चार लाख रूपये मंजुर झाले होते.सदरची रक्कम मला विहीरीचे झालेले कामाचे टप्यानुसार मला मिळणार होती.त्यानुसार विहीरीचे काम सुरू झाल्यानंतर आज पर्यंत सुमारे 2,75,602/- रूपये मिळालेले आहेत.आता माझे विहीरीचे काम पुर्ण झाले असुन, विहीरीचे मंजुर रकमे मधील उर्वरीत रक्कम 1,23,924/- रूपये बाकी असुन,त्याबाबत मी आमचे गावातील ग्राम रोजगार सेवक बाळु उर्फ दिपक शेलार,याची काल दि.21/10/2024 रोजी कोंभळी ता.कर्जत येथे भेट घेतली असता,त्यांनी मला सांगितले की,तुमच्या विहीरीचे उर्वरीत बिल पंचायत समिती कर्जत येथुन मंजुर करायचे असेल तर त्या कामासाठी पंचायत समिती येथील अकाउंट ऑफीसर,ऑनलाईन डेटा ऑपरेटर, ईंजिनीअर यांना सर्वांना मिळुन तीन हजार रूपये दयावे लागतील,असे मला रोजगार सेवक शेलार याने सांगितले.त्यावेळी माझे लक्षात आले की,माझे पंचायत समिती कार्यालय कर्जत येथुन विहीरीचे कामाचे उर्वरीत बिल मंजुर करण्याचे कामासाठी ग्राम रोजगार सेवक दिपक शेलार हे पंचायत समिती,कर्जत येथील कर्मचा-यांसाठी तीन हजार रूपये लाचेची मागणी करत आहेत.त्यानंतर मी आमचे गावचे तत्कालीन ग्रामसेवक संदिप भोईटे यांना फोन करून त्यांना रोजगार सेवक शेलार हा माझे विहिरीचे कामाचे उर्वरीत बिल मंजुर करण्याकरीता पंचायत समिती मधील कर्मचा-यांना पैसे दयावे लागतील असे मला सांगत आहे, असे त्यांना कळविले असता,ग्रामसेवक भोईटे यांनी देखील मला पंचायत समिती मधील कर्मया-यांना पैसे

दयावे लागतील असे सांगितले.ग्राम रोजगार सेवक शेलार हे पंचायत समिती,कर्जत येथील कर्मया-यांसाठी माझेकडे तीन हजार रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत वगैरे मजकुराची तक्रार सांगितली." मी सांगितलेली तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास पोनि.आल्हाट यांनी मला सांगितले.त्यावरून मी माझ्या स्वहस्ताक्षरात सविस्तर तक्रार लिहुन दिली त्यावर मी,दोन्ही पंचांनी व पोनि आल्हाट यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन लोकसेवक शेलार यांची लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.पोनि श्री.आल्हाट यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत मला व पंचांना माहिती समजावून सांगितली.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालुन,व्हाईस रेकॉर्डर चालु करून,त्या मेमरीकार्ड मध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट,दोन्ही पंच व मी निवेदन केले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या.

त्यांनतर लोकसेवक शेलार हे कोठे आहेत याची माहीती घेण्यासाठी त्यांना कॉल करण्याचे ठरले,त्याप्रमाणे मी माझा मोबाईल क्र.9657736434, यावरून लोकसेवक शेलार यांना त्यांचा मोबाईल क्र.7028451101 याचेवर दुपारी 01/09 वा.कॉल करून ते कोठे आहेत याबाबत विचारले असता,त्यांनी ते गावात असल्याचे सांगुन मला थाबण्यास सांगिले,त्यानंतर पुन्हा 02/37 वा.चे सुमारास कॉल केला असता,त्यांनी मला दहा ते पंधरा मिनीटात आलो,असे सांगुन पंचायत समिती मध्ये येण्यास सांगितले.त्यानंतर बराच वेळ लोकसेवक शेलार यांचा कॉल आला नसल्याने त्यांना फोन करण्याचे ठरले,त्याप्रमाणे माझे मोबाईल वरून त्यांचे वरील क्रमांकावर फोन केला असता,त्यांनी ते पंचायत समिती येथे आल्याचे मला सांगितले.त्यावेळी मी त्या ठिकाणी येत असल्याचे सांगितले. सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला.त्याप्रमाणे लोकसेवक शेलार यांची पंचायत समिती,कर्जत येथे भेट घेण्याचे ठरले. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी मला,पंच नं.1 यांचेसह माझे स्विफ्ट कारने रवाना केले.त्याप्रमाणे आम्ही लोकसेवक शेलार यांची भेट घेण्याकरीता पंचायत समिती कार्यालय,कर्जत येथे 03/25 वा.चे सुमारास रवाना झालो.

मी व पंच नं. 1 असे पंचायत समिती कार्यालय,कर्जत येथे जावुन,लोकसेवक शेलार यांची कार्यालयात भेट घेतली. त्यावेळी मी लोकसेवक शेलार यांचेशी माझे कामासंबधी चर्चा केली.चर्चेदरम्यान लोकसेवक शेलार यांनी मला तुम्हाला पैसे दयायचे आहेत का,फुकट करायचे आहे,असे विचारले असता,त्यावेळी मी त्यांना किती पैसे दयायचे असे विचारले.त्यावेळी ते मला म्हणाले की,तीन हजार रूपये दयावे लागतील,त्यावेळी मी त्यांना कुणाला कुणाला दयावे लागतील असे विचारून कासले यांना हजार का ? असे विचारले असता,त्यावेळी शेलार हा.. असे म्हणाले. त्यानंतर मी शेलार यांना फोन पे नी देवु का असे विचारले असता,लोकसेवक शेलार मला,रोखच दया..असे म्हणाले. त्यावेळी आम्ही तेथील अकाऊंट ऑफीसर कासले भाऊसाहेब यांना भेटलो,त्यांचेसोबत चर्चा केली त्यानंतर लोकसेवक शेलार यांचेसोबत बाजुला आल्यानंतर,लोकसेवक शेलार मला म्हणाले की,तु ईथ नाही दिल तर,तसच पेंडीग पडेल,त्यावेळी मी त्यांना पैसे देतो असे म्हणालो.त्यानंतर मी त्यांना ग्रामसेवक भोईटे भाऊसाहेब यांना फोन लावण्यास सांगितले,त्यावेळी लोकसेवक शेलार यांनी भोईटे ग्रामसेवक यांना फोन लावला,त्यावेळी लोकसेवक शेलार यांचे ग्रामसेवक भोईटे यांचेसोबत बोलणे झाल्यानंतर,लोकसेवक शेलार यांनी मला ग्रामसेवक भोईटे यांचेसोबत बोलण्याकरीता फोन दिला,त्यावेळी मी भोईटे ग्रामसेवक यांना लोकसेवक शेलार हे माझ्याकडे तीन हजार रूपये मागत असल्याबाबत सांगितले.त्यावेळी भोईटे ग्रामसेवक मला म्हणाले की,कमी जास्त करून देवुन टाका...करा असे म्हणुन मला लोकसेवक शेलार यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिले त्यानंतर मी लोकसेवक शेलार यांना दहा पंधरा मिनीटात पैसे घेवुन येतो असे म्हणालो असता,लोकसेवक शेलार यांनी होकारार्थी मान हालवुन लाच स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले.त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो.त्यावेळी पोनि आल्हाट यांनी माझ्या ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला.

त्यांनतर मी व पंच क्र.1 यांनी वरील घडला प्रकार पोनि आल्हाट यांना पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितला तसेच पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉप मध्ये कॉपी करून ऐकत असताना लोकसेवक शेलार यांनी माझ्याकडे वैयक्तिक जलसिंचन विहिरीचे कामाचे उर्वरित बिल मंजुर करण्याकरीता पंचायत समिती, कर्जत येथील अकाउंट ऑफीसर कासले यांचेकरीता तसेच इतर कर्मचा-यांकरीता तीन हजार रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केल्याबाबतची तसेच लोकसेवक भोईटे यांनी सदरची लाच रक्कम देण्याकरीता प्रोत्साहन दिल्याची खात्री झाली.त्यावेळी लोकसेवक शेलार यांचेविरुध्द सापळा कारवाई करण्याचे ठरले त्याच दरम्यान लोकसेवक शेलार यांचा फोन कॉल येत असल्याने सदर फोन कॉल उचलुन सदरचा फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्याचे ठरले.त्याप्रमाणे पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन

व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मला लोकसेवक शेलार यांचा फोन उचलुन स्पिकर फोन चालु करण्यास सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक शेलार यांचा आलेला फोन उचलला असता, लोकसेवक शेलार यांनी पंचायत समिती येथे येवुन बीडीओ साहेबांना भेटण्याकरीता बोलवत असल्याचे सांगितले.त्यावेळी मी त्यांना दहा पंधरा मिनीटांत आलो असल्याचे सांगितले.त्यानंतर पुन्हा लोकसेवक शेलार यांना फोन करून विचारणा केल्यानंतर बीडीओ साहेबांची पंचायत समिती,कर्जत येथे भेट घेण्याचे ठरले त्याप्रमाणे मला व पंच नं.1 यांना योग्य सुचना देवुन,व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझेकडे देवुन,माझे स्विफ्ट कारने 17/07 वा.चे सुमारास रवाना केले. त्याप्रमाणे मी,सोबत पंच नं.1 असे पंचायत समिती,कर्जत येथे जावुन लोकसेवक शेलार यांची भेट घेतली.त्यावेळी मी लोकसेवक शेलार यांचेसोबत बीडीओ जाधव साहेब यांची त्यांचे कक्षात जावुन भेट घेतली.त्यावेळी त्यांनी कामासंबंधाने चर्चा केली त्यानंतर मी सोबत लोकसेवक शेलार असे बाहेर आल्यानंतर आम्ही लोकसेवक कासले यांची भेट घेतली.त्यावेळी लोकसेवक शेलार हे त्यांना म्हणाले आमचे लाभार्थी आले आहेत काय,,असेल ते तुमचे देवुन टाकु म्हंटले, त्यावर लोकसेवक कासले म्हणाले कि,ऑनलाईन होवु दया व्हेरीफाय होईल ते,त्यानंतर मी लोकसेवक कासले यांना म्हणालो कि,तीन हजार रूपये त्याच्याकडे देवुन टाकतो,बघा तुमच काय असेल ते त्यावेळी लोकसेवक कासले यांनी पंचासमक्ष हो म्हणुन संमती दर्शवली. त्यानंतर लोकसेवक शेलार हे खाजगी वाहनाने निघुन गेले व मी तसेच सोबत पंच नं.1 असे सापळा पथक थांबल्या ठिकाणी परत आलो. यावेळी पोनि आल्हाट यांनी माझ्या ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला.

त्यानतर मी व पंच क्र.1 यांनी वरील घडला प्रकार पोनि आल्हाट यांना पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितला.तसेच पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉप मध्ये कॉपी करून ऐकली असता लोकसेवक शेलार यांनी माझ्याकडे वैयक्तिक जलसिंचन विहिरीचे कामाचे उर्वरित बिल मंजुर करण्याकरीता पंचायत समिती, कर्जत येथील अकाउंट ऑफीसर कासले तसेच इतर कर्मचा-यांकरीता मागणी केलेली तीन हजार रुपये लाचेची रक्कम लोकसेवक कासले यांनी स्विकारण्याची तसेच सदर लाच रक्कम लोकसेवक शेलार यांचेकडे देण्याची संमती दर्शवल्याची खात्री झाली.त्यानंतर माझे समोरून लोकसेवक शेलार हे पंचायत समिती मधुन इतर ठिकाणी खाजगी वाहनाने गेल्याने तसेच अपरात्र झाल्याने दिनांक 23/10/2024 रोजी लोकसेवक शेलार यांचे विरुध्द सापळा कारवाई करण्याचे ठरले.त्याप्रमाणे पोनि आल्हाट यांनी मला दिनांक 23/10/2024 रोजी सुरक्षित ठिकाणी 12/00 हजर राहण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी दिनांक 23/10/2024 रोजी 12/00 वा.चे सुमारास सुरक्षित ठिकाणी हजर असताना पोनि आल्हाट सापळा पथकासह सुरक्षित ठिकाणी हजर झाले त्यानंतर लोकसेवक शेलार यांचे विरुध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले.लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 3000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 6 भारतीय चलनी नोटा,अशी रक्कम हजर केली.पोनि आल्हाट यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पो.कॉ.सुद्रुक यांनी करून दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली,एका को-या कागदावर त्या नोटाचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर लाच रक्कम लोकसेवक शेलार यांना देण्याकरीता माझ्या ताब्यात दिली.पोनि आल्हाट यांनी सापळा कारवाई बाबत मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या.लोकसेवक शेलार हे कोठे आहेत याची माहीती घेण्यासाठी त्यांना कॉल करण्याचे ठरले,त्याप्रमाणे मी माझा मोबाईल क्र. 9657736434, यावरून लोकसेवक शेलार यांना त्यांचा मोबाईल क्र.7028451101 याचेवर दुपारी 12/34 वा.कॉल करून ते कोठे आहेत याबाबत विचारले असता,त्यांनी एक ते दिड तास यायला लागेल असे सांगितले सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला त्यानंतर लोकसेवक शेलार यांचा बराच वेळ कॉल न आल्याने लोकसेवक शेलार यांना पुन्हा कॉल करण्याचे ठरले त्याप्रमाणे लोकसवेक शेलार यांना 14/51 वा.चे सुमारास कॉल केला असता लोकसेवक शेलार यांनी पंचायत समिती येथे आल्यानंतर कॉल करतो असे सांगितल्याने सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला त्यानंतर मी सोबत पोनि आल्हाट,पंच व सापळा पथकासह पंचायत समिती,कर्जत येथे येवुन लोकसवेक शेलार यांना 17/28 वा.चे सुमारास कॉल केला असता लोकसेवक शेलार यांनी पंचायत समिती येथे आल्याचे सांगितले असता मी त्यांना पाच मिनिटांमध्ये येतो असे सांगितले.सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला. पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉडर चालु करून माझ्या ताब्यात दिले.त्यानंतर मला,पंच क्र. 1 तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या व त्यानंतर मी सोबत पंच नं.1 असे माझ्याकडील स्विफ्ट कारने रवाना झालो व पोनि आल्हाट, पंच क्र. 2 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने आमचे मागोमाग आले,मी व पंच नं.1 असे पंचायत समिती,कर्जत येथे आल्यानंतर थांबलो.सापळा पथक आमचे पाठोपाठ आल्याची खात्री झाली.त्यावेळी मी व पंच नं. 01 असे लोकसेवक शेलार यांची भेट घेण्याकरीता पंचायत समिती कार्यालयाच्या आत गेलो त्यावेळी आमच्या पाठोपाठ सापळा पथक देखील कार्यालयाचे जवळ येवुन थांबले.त्यानंतर लोकसेवक शेलार हे पंचायत समिती

कार्यालयामधुन बाहेर आवारात आले असता लोकसेवक शेलार यांची भेट घेवुन मी माझे शर्टाचे खिशामधील 3000/- रूपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन लोकसेवक शेलार यांना देण्यासाठी त्याचेसमोर धरली असता, त्यावेळी लोकसेवक शेलार यांनी मी त्यांचेसमोर धरलेली लाच रक्कम 3000/- रूपये त्यांचे उजवे हाताने स्वीकारली.त्यावेळी मी सापळा पथकास लोकसेवक शेलार यांनी लाच स्वीकारल्याचा नियोजित इशारा केला. त्यावेळी पोनि आल्हाट, पंच क्र.2 व सापळा पथक तेथे आले व लोकसेवक शेलार यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले.व पंच नं.02 करवी लोकसेवक शेलार यांनी स्विकारलेली लाच रक्कम त्यांचे हातामधुन हस्तगत केली. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी लोकसेवक शेलार यांना त्यांचे नाव,गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव बाळु उर्फ दिपक नाना शेलार,वय-43 वर्षे,पद-ग्राम रोजगार सेवक,कोंभळी ग्रामपंचायत,रा.कोंभळी,ता.कर्जत,जि.अहिल्यानगर असे सांगीतले.त्यानंतर मला पोनि आल्हाट यांनी शासकीय विश्रामगृह, कर्जत येथे येण्यास सांगीतले व पोनि आल्हाट व त्यांचे सापळा पथक पुढील कामकाज करणेकामी लोकसेवक शेलार यांना घेवुन शासकीय विश्रामगृह, कर्जत येथे गेले मी पण त्यांचे मागोमाग माझ्या दुचाकी वाहनाने विश्रामगृह येथे आलो. त्याठिकाणी सापळा पथकाने त्यांचे पुढील कामकाज केले.त्यानंतर सदर कारवाईमध्ये नव्याने हजर झालेले श्री.त्रिपुटे, पोलीस उप अधिक्षक,ला. प्र.वि.अहिल्यानगर व त्यांचेसोबतच्या पथकाची पोनि आल्हाट यांनी माझेसोबत ओळख करून दिली.त्यानंतर मी पोलीस उप अधिक्षक श्री.त्रिपुटे व त्यांचे सोबतच्या पथकासोबत जावुन गोपनिय माहितीच्या आधारे लोकसेवक कासले व लोकसेवक भोईटे यांना श्री.त्रिपुटे व त्यांचे पथकाने ताब्यात घेतले व शासकिय विश्रामगृह येथे घेवुन आलो त्यावेळी लोकसेवक कासले यांना त्यांचे नाव,गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव नामदेव दिगंबर कासले,पद-कनिष्ट लेखाधिकारी,पंचायत समिती,कर्जत,ता.कर्जत,जि.अहिल्यानगर,रा.हनुमंत भोगे यांचे घरी भाडयाने, भांडेवाडी, कर्जत, ता.कर्जत,जि.अहिल्यानगर,मुळ रा.मेहबुब नगर,काळेगाव रोड,अहमदपुर, ता. अहमदपुर, जि.लातुर असे सांगितले त्यानंतर लोकसेवक भोईटे यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अनिल अंकुश भोईटे,वय-41 वर्षे,पद-ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अळसुंदे,ता.कर्जत,जि.अहिल्यानगर, रा.तिरूपती नगर, कर्जत,ता.कर्जत,जि.अहिल्यानगर, मुळ रा.घारगाव ता.श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर असे सांगितले.
तरी दि.22/10/2024 रोजी 15/24 वा. ते 17/47 वा.च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक बाळु उर्फ दिपक शेलार यांनी माझे पंचायत समिती कार्यालय,कर्जत येथुन माझे विहीरीचे कामाचे उर्वरीत बिल 1,23,924/- रूपये मंजुर करण्याचे कामासाठी पंचायत समिती,कर्जत येथील लोकसेवक नामदेव दिगंबर कासले,कनिश्ठ लेखाधिकारी यांचेसाठी तसेच इतर कर्मचा-यांसाठी पंचासमक्ष 3000/- रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले व तसेच लोकसेवक नामदेव दिगंबर कासले,कनिष्ट लेखाधिकारी यांनी पंचासमक्ष सदरची लाच रक्कम स्विकारण्याची संमती दर्शवुन सदरची लाच रक्कम लोकसेवक बाळु उर्फ दिपक शेलार यांचेकडे देण्याची संमती दिली व लोकसेवक अनिल अंकुश भोईटे यांनी मला पंचासमक्ष सदरची लाच रक्कम देण्यास प्रोत्साहन दिले. व दिनांक 23/10/2024 रोजी 17/31 ते 17/34 वा.चे दरम्यान लाच सापळा कारवाई दरम्यान सदरची लाच रक्कम लोकसेवक शेलार यांनी पंचायत समिती,कर्जत येथे पंचासमक्ष स्विकारली म्हणुन 1) नामदेव दिगंबर कासले, पद-कनिष्ट लेखाधिकारी, पंचायत समिती,कर्जत,ता.कर्जत,जि.अहिल्यानगर 2) अनिल अंकुष भोईटे,वय-41 वर्षे, पद-ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अळसुंद, ता.कर्जत,जि.अहिल्यानगर 3) लोकसेवक बाळु उर्फ दिपक नाना शेलार,वय-43 वर्षे,पद-ग्राम रोजगार सेवक, कोंभळी ग्रामपंचायत,रा.कोंभळी,ता.कर्जत,जि.अहिल्यानगर यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

हे लिहून दिले.

( आर.बी.आल्हाट )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर

( राहुल विष्णु गांगर्डे )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Sambhaji Baburav Wable
**Rank** (पद): PC (Police Constable) **No.**(क्र.): 1122
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
कर्जत पोलीस स्टेशन अ.नगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Maruti Namdeo Mulı
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pobnpcmam85159